**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,

दिनांक :- १९/०७/२०१४

**मा. विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**

**सभा क्रमांक १० दिनांक १९/०७/२०१४**

**सभा सूचना क्रमांक ०३ दनांक ०५/०७/२०१४**

**सभा क्रमांक ०४ दिनांक १९/०७/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०३ दिनांक ०५/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदर दिवशी सभा खंडीत केल्याने सदरची सभा शनिवार दिनांक १९/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- महापौर**

**२) श्री. मुकेश मधुकर मोकशी-उपमहापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | 4 | नरेश रतन मणेरा |
| 5 | उषा संजय भोईर | 6 | डुंबरे मनोहर जयसिंग |
| 7 | आशादेवी शेरबहादूर सिंह | 8 | उज्वला रामचंद्र फडतरे |
| 9 | चव्हाण सुधाकर वामन | 10 | मधुकर रामचंद्र पावशे |
| 11 | इंदिसे रेखाबाई मिनानाथ | 12 | भोईर संजय देवराम |
| 13 | राजकुमार रामनयन यादव | 14 | चव्हाण तेजस्विनी किरण |
| 15 | सरैय्या अमित जयसिंग | 16 | वाव्हळ सुभाष सिताराम |
| 17 | जगदाळे हनुमंत ज्ञानु | 18 | संभाजी धोंडिराम पंडीत |
| 19 | पालांडे दशरथ बाबुराव | 20 | विलास चंदू कांबळे |
| 21 | सरनाईक विहंग प्रताप | 22 | राधा फत्तेबहादूर सिंह |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | लासे विजया मनोज | 24 | जाधवर राधाबाई सुभाष |
| 25 | पाटील उमेश काशिनाथ | 26 | सरनाईक परिषा प्रताप |
| 27 | देसाई सुहास सुर्यकांत | 28 | भोईर विमल अर्जून |
| 29 | नंदिनी राजन विचारे | 30 | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| 31 | वडवले संतोष वसंत | 32 | साप्ते राजेंद्र रमेश |
| 33 | तायडे रामभाऊ महादेव | 34 | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| 35 | आशा बाबासाहेब कांबळे | 36 | महेश्वरी संजय तरे |
| 37 | शान मनप्रीत गुरमकसिंग | 38 | नंदा कृष्णा पाटील |
| 39 | संगिता माणिक पाटील | 40 | मंदार प्रमोद विचारे |
| 41 | घाडीगांवकर संजय पांडुरंग | 42 | कणसे निर्मला शरद |
| 43 | खताळ विशाखा मधुकर | 44 | बोरीटकर प्रभा अशोक |
| 45 | जगताप अश्विनी अशोक | 46 | भोईर एकता एकनाथ |
| 47 | हिराकांत बेंडू फर्डे | 48 | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| 49 | मोरे रुचिता राजेश | 50 | शिंदे मनोज तुकाराम |
| 51 | सोनार सारिका संजय | 52 | काशिराम गोविंद राऊत |
| 53 | महेश सुरेश वाघ | 54 | मोरे संध्या सुनिल |
| 55 | साळवी अपर्णा मिलींद | 56 | जानकर योगेश तातोबा |
| 57 | मोरे संजय भाऊराव | 58 | फाटक रविंद्र सदानंद |
| 59 | म्हस्के नरेश गणपत | 60 | पाटील सुजाता भास्कर |
| 61 | नारायण शंकर पवार | 62 | वाघ पुजा गणेश |
| 63 | मेघना सुनिल हंडोरे | 64 | संजय संतू वाघुले |
| 65 | लोखंडे सुहासिनी सुनिल | 66 | राजे गिरीश अनंत |
| 67 | अनिता अरुण बिर्जे | 68 | पाटील अवंतिका शशिकांत |

| | | | |
|---|---|---|---|
| 69 | पाटील मालती रमाकांत | 70 | यादव रिटा राजनाथ |
| 71 | नाईक राजश्री सुनिल | 72 | काकडे बालाजी दगडू |
| 73 | ठाकुर अक्षय अनंत | 74 | पाटील रेश्मा रमेश |
| 75 | किणे राजन नारायण | 76 | डोंगरे सिराज महम्मद अली |
| 77 | मिरजा जमेला तबस्सूम इनायत बेग | 78 | हिरा सिताराम पाटील |
| 79 | आशरीन इब्राहीम राऊत | 80 | पाटील शैलेश मनोहर |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | आरज प्रगती भारत | 2. | मढवी बिंदू महेंद्र |
| 3. | पुर्णेकर जयनाथ यशवंत | 4. | स्नेहा अंकुश पाटील |
| 5. | प्राजक्ता प्रदिप खाडे | 6. | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| 7. | चिंदरकर कांचन विजय | 8. | पाटील वर्षा वसंत |
| 9. | चव्हाण विक्रांत भिमसेन | 10. | पांडे संजय श्रीनाथ |
| 11. | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर | 12. | पाटील शारदा विजय |
| 13. | गौरी अनिता सुनील | 14. | मिलिंद माधव पाटणकर |
| 15. | एगडे रामचंद्र हरी | 16. | वैती अशोक बारकू |
| 17. | फाटक जयश्री रविंद्र | 18. | वेतकर दिपक विजय |
| 19. | संखे मिनल मुकूंद | 20. | भोसले नम्रता दिपक |
| 21. | कोकाटे सुधीर विष्णु | 22. | नजीब सुलेमान मुल्ला |
| 23. | वहिदा मुस्तफा खान | 24. | साळवी मनोहर रामा |
| 25. | महेश जगन्नाथ साळवी | 26. | मनिषा महेश साळवी |
| 27. | पाटील मिलींद भारत | 28. | पाटील मनाली मिलींद |
| 29. | केणी प्रमिला मुकूंद | 30. | केणी मुकूंद बाळू |
| 31. | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट | 32. | सामंत विलास शिवराम |
| 33. | भारत अभिमन्यु चव्हाण | 34. | रेखा भालचंद्र पाटील |
| 35. | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) | 36. | राजेश भालचंद्र गवारी |

भूखंड शहरविकास विभागाने तात्काळ ताब्यात घ्यावे व त्याठिकाणी पार्कींग प्लाझासारखे उपक्रम जर राबविले तर मालमत्ता करामध्ये वाढ होऊ शकते.

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रभाग कार्यालय बांधणे या लेखाशिर्षकाअंतर्गत मुंब्रा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग कार्यालय बांधणे याकरीता दिडकोटीची तरतुद करण्यांत आली आहे. याठिकाणी मा.सभागृह नेते व विरोधी पक्षनेते यांनी दिड वर्षापुर्वी सूचना केली होती नौपाडा प्रभाग समिती कार्यालय तोडुन त्याठिकाणी तळमजला पहिल्या मजल्यावर पार्कींग करुन बीओटी तत्वावर तेथे जर कार्यालय बांधल्यास पार्कींगची समस्या सुटु शकते. आज त्याठिक्राणी अपुरी असलेली जागा, तसेच कर्मचा-यांना अपुरी असलेली जागा. त्या हद्दीमध्ये येणा-या प्रभाग समितीमध्ये १०० टक्के मालमत्ता कर हे नागरीक भरत असतात. तरी सदर ठिकाणी संपूर्ण नविन इमारत बांधावी याकरीता यावर्षीच्या बजेटमध्ये जरी तरतुद नसलीतरी बीओटी तत्वावर इमारत बांधल्यास पार्कींगची समस्या सुटु शकते तसेच तेथे एंक समितीला कार्यालय उपलब्ध होऊ शकते,अशी माझी सूचना आहे. तसेच या बीओटीबाबत कोणीही प्रतिसाद देईल,कारण ठाणे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी ही जागा असल्यामुळे व तेथे नविन इमारत बांधल्यास महात्मा गांधी रोडवरील पार्कींगची समस्या सुटु शकते,तसेच विरोधी पक्षनेते व सभागृह नेते यांनी जी सूचना केली होती त्या सूचनेची अदयाप अंमलबजावणी करण्यांत आली नाही, याबाबत प्रस्तावाची सूचना मांडण्यात आली होती व प्रशासनाने ती बाजुलाच ठेवली आहे त्यावर अदयाप कार्यवाही केली नाही. तरी ती तात्काळ करावी अशी मी प्रशासनास सूचना करीत आहे.

महापौर महोदय,परिवहन सेवेबाबत बोलायचे तर ठाणे महापालिकेची परिवहन सेवा सन १९८९ साली चालु करण्यात आली. आज ३२० बसेस परिवहन सेवेमध्ये आहेत. रोज सरासरी १६० ते १८० बसेस आगारातुन बाहेर पडतात व त्यातील जवळजवळ १० ते १२ बसेस या महामार्गावर कोठेनाकोठे बंद पडलेल्या आढळुन येतात त्यामुळे अनेक ठाणेकर नागरीकांची यामुळे गैरसोय होते. ठाणे स्टेशन या विभागामधुन मी निवडुन आल्यामुळे त्याठिकाणी सॅटीस परिसरामध्ये प्रवाशांच्या असलेल्या रांगा, संध्याकाळी ५ ते ८ च्या दरम्यान गोखले रोडला शेअर रिक्षासाठी उभे असलेले नागरीक जे ठाणे शहरातील कानाकोप-यातुन स्टेशनला येत असतात. गोखले रोडला संध्याकाळी सावरकर नगर ,लोकमान्यनगर,रस्त्याच्या दोन्हीबाजुला अनेक प्रवासी उभे असतात. आज परिवहन सेवा ही तोटयात चालली आहे त्यामुळे परिवहनसेवेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. जेएनयुआरएमअंतर्गत ज्या बसेस येणार आहेत त्या लवकरात लवकर परिवहनमध्ये सामिल करुन घेतल्या गेल्या पाहिजेत.पुणे येथील सीआरआरटी या संस्थेने एक सर्व्हे केला आहे त्या सर्व्हेच्या माध्यमातुन ठाणे शहराची जी लोकसंख्या आहे ती लोकसंख्या ही १८ ते२० लाखाच्याघरांत पोहचली आहे. एकलाख लोकसंख्येमागे ३० बसेस, तर जवळजवळ ठाणे परिवहन सेवेमध्ये ६०० बसेसची आवश्यकता आहे. आज याठिकाणी परिवहन व्यवस्थापक उपस्थित नाहीत . आपल्या सेवेमध्ये ४०० बसेस येणार आहेत. परंतू ६०० बसेसची आवश्यकता असल्यामुळे परिवहन व्यवस्थापक हे त्याठिकाणी काम करीत असताना ज्याप्रमाणे बीएसटी ही मुंबईची लाईफलाईन आहे परंतू आपल्या परिवहन सेवेमध्ये गेल्या २० वर्षात अदयाप सुधारणा होत नाही. आज परिवहन सेवेमध्ये असलेले व्यवस्थापक यांनी यापुर्वी कोठल्याही महापालिकेमध्ये परिवहनचे काम केले आहे का, परिवहन व्यवस्थापक हे बीएसटीच्या धर्तीवर सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे नाहीतर परिवहन सेवा डबघाईला येण्यास वेळ लागणार नाही. तरी ठाणेकर नागरीकांना चांगली सेवा पुरविणे आवश्यक आहे.

**श्री.संजय मोरे :**

सन्मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्प व सन २९१३-१४ चा सुधारीत अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी मा.स्थायी समिती सभापती श्री. सुधाकर चव्हाण हयांनी सर्वसाधारण सभेपुढे दिनांक १५ जुलै २०१४ रोजी सादर केला.

मा.महापौर महोदय, पालिकेचा अर्थसंकल्प हा शहरी जनतेचा जिव्हाळयाचा प्रश्न असतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अर्थसंकल्पाचा मूळ गाभा हा त्या त्या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेली साधन सामुग्री जनतेच्या हिताच्या दृष्टीने उत्तमोत्तम वापरणे आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीने जास्तीत जास्त उपयुक्तता साधणे तसेच मागील काही वर्षांचा अनुभव गाठीशी घेऊन पुढील वर्तमानासाठी नेटके नियोजन करणे हे अर्थसंकल्पाचे मूळ उद्दीष्ट असते. मा.महापौर महोदय, या दृष्टीने सर्व सन्मा.सदस्यांनी आपले बजेटवरील विचार मांडले आहेत आणि काही नेते मंडळी आपले विचार या ठिकाणी मांडणार आहेत, काल तर सन्मा.सदस्य श्री.हिरा पाटील हयांनी त्यांच्या अनोख्या शैलीमध्ये त्यांचे विचार या ठिकाणी मांडले आहेत परंतू एक दुर्दैव म्हणजे त्यांना या ठिकाणी असे नमूद करावे लागले की आम्हाला निधीसाठी भिक मागावी लागते. ही सर्वात दुर्दैवाची बाब आहे. विषय असा आहे की, आपण जे बजेट करतो, गेल्या तीन वर्षात आपल्या बजेटची परिस्थिती काय आहे याचा विचार करुन जर आपण पुढचे बजेट तयार केले तर ते खरे आणि वस्तुनिष्ठ असेल असे मला वाटते. परंतू प्रशासनाने हे बजेट केल्यानंतर स्थायी समितीमध्ये त्यावर चर्चा करण्यांत आली, नुसती चर्चाच केली नाही तर आकडयांची कसरत करुन मा. स्थायी समितीने मा.सर्वसाधारण सभेला हे बजेट सादर केले. पण त्या बजेटमध्ये नेमके काय आहे, खरेतर मा.आयुक्त सा़े., यांनी सांगितले आहे की, सर्वसमावेशक असे बजेट मी सादर केले आहे. प्रत्येक नगरसेवकांची या संदर्भात काही ना काही तक्रार आहे, मग तो दिव्याचा नगरसेवक असो, घोडबंदरचा नगरसेवक असो अथवा वागळेचा नगरसेवक असो किंवा डोंगरावरचा नगरसेवक असो. मा.महापौर महोदय, जो कर दाता आहे त्या प्रत्येकाचा या बजेटमध्ये विचार होणे आवश्यक आहे, परंतू ते होत नाही. बजेट बाबत सर्वच नगरसेवकांची तीच ओरड आहे. असे म्हणतात ना की, जिसकी लाठी उसकी भैंस. आता सध्या एक प्रचलित असा एक सुविचार आहे, हम दो आपके चार, हम बनाये हमारा सुखी संसार बाकी सब बेकार अशातील म्हण सध्या प्रचलित आहे. त्यामुळे बजेटबाबत बोलण्याचा देखिल त्यांना उत्साह राहिलेला नाही. त्यामुळे मा.महापौर महोदय, या प्रशासनाने दिलेली माहिती आहे त्या अनुषंगाने सांगतो की दर वर्षी आपण बजेट तयार करतो, सन २००९ चा जर आपण ऑडिट रिपोर्ट पाहिला तर त्या वेळेचे बजेट हे ॲक्च्युअल फिगरच्या वेळेला ७०% नी कमी झाले होते. काही जण म्हणतात की सूज आली, पण किती अवस्था आपण तयार करतो आहोत, आज २०१०-११ ला ॲक्च्युअल फिगर जी होती ती ११०३ कोटींची, म्हणजे जी मूळ जमा झाली, खर्च किती झाला तो सोडून दया. त्यावेळेला २००० गृहीत धरुन त्याप्रमाणे आपण बजेट तयार केलेले असणार आणि त्याप्रमाणे खर्च केलेला असणार. आणि मग ते स्पील ओव्हर वाढते. त्याच बरोबर २०११-१२ ला १५०० कोटी आणि २०१२-१३ ला १३३३ कोटी ही ॲक्च्युअल फिगर आहे. ३१ मार्चला आपल्याकडे ॲक्च्युअली जमा झालेल्या या रकमा आहेत. आणि जर या तीन वर्षाचा आपण विचार केला तर सन २०१३-१४ चे बजेट पाहता, आपण २१०० चे बजेट आपण मागील वर्षी मंजूर केले. त्यानंतर सुधारीत मध्ये ते १६०० वर आणले. आणि हे १६०० चे देखिल मंजूर केले पण प्रत्यक्ष आकडेवारी पाहिली तर १३७६ कोटी इतकीच आहे. म्हणजे गेल्या तीन ते चार महिन्यात इन ॲव्हरेज असे आहे की १३०० ते १४०० कोटी फक्त आपल्याकडे जमतात. आणि त्या अनुषंगाने आपण खर्च किती करतो हयाचा देखिल विचार केला गेला पाहिजे. फक्त मी आहे माझ्या प्रभागात काहीतरी व्हावे किंवा माझा मतदार संघ मी सांभाळावा या दृष्टीने जर विचार केला तर योग्य होणार नाही. मा.महापौर महोदय, आस्थापना खर्च आणि स्पील ओव्हर पाहिले तर, भांडवली खर्चामध्ये ११६१ कोटींचे स्पील ओव्हर आहे. ७७२ कोटींचे देयक आहे. हे जर दिले आणि आस्थापना आणि इतर महसूली खर्च जर धरला तर मला वाटत नाही की, या आर्थिक वर्षामध्ये खर्च करायला आपल्याकडे काही शिल्लक आहे. तरी आपण हया ठिकाणी ज्या

**तद्नंतर मा.महापौर सो., सभा खंडीत झाल्याचे घोषित करतात.**

**श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील**
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**(सौ.छाया प्रकाश मानकर)**
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : १९ जुलै २०१४
सभा खंडीत झाल्याची वेळ : दुपारी २.४५ वा.

**श्री.संजय मोरे :**

सन्मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्प व सन २९१३-१४ चा सुधारीत अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी मा.स्थायी समिती सभापती श्री. सुधाकर चव्हाण हयांनी सर्वसाधारण सभेपुढे दिनांक १५ जुलै २०१४ रोजी सादर केला.

मा.महापौर महोदय, पालिकेचा अर्थसंकल्प हा शहरी जनतेचा जिव्हाळयाचा प्रश्न असतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अर्थसंकल्पाचा मूळ गाभा हा त्या त्या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेली साधन सामुग्री जनतेच्या हिताच्या दृष्टीने उत्तमोत्तम वापरणे आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीने जास्तीत जास्त उपयुक्तता साधणे तसेच मागील काही वर्षांचा अनुभव गाठीशी घेऊन पुढील वर्तमानासाठी नेटके नियोजन करणे हे अर्थसंकल्पाचे मूळ उद्दीष्ट असते. मा.महापौर महोदय, या दृष्टीने सर्व सन्मा.सदस्यांनी आपले बजेटवरील विचार मांडले आहेत आणि काही नेते मंडळी आपले विचार या ठिकाणी मांडणार आहेत, काल तर सन्मा.सदस्य श्री.हिरा पाटील हयांनी त्यांच्या अनोख्या शैलीमध्ये त्यांचे विचार या ठिकाणी मांडले आहेत परंतू एक दुर्दैव म्हणजे त्यांना या ठिकाणी असे नमूद करावे लागले की आम्हाला निधीसाठी भिक मागावी लागते. ही सर्वात दुर्दैवाची बाब आहे. विषय असा आहे की, आपण जे बजेट करतो, गेल्या तीन वर्षात आपल्या बजेटची परिस्थिती काय आहे याचा विचार करुन जर आपण पुढचे बजेट तयार केले तर ते खरे आणि वस्तुनिष्ठ असेल असे मला वाटते. परंतू प्रशासनाने हे बजेट केल्यानंतर स्थायी समितीमध्ये त्यावर चर्चा करण्यांत आली, नुसती चर्चाच केली नाही तर आकडयांची कसरत करुन मा. स्थायी समितीने मा.सर्वसाधारण सभेला हे बजेट सादर केले. पण त्या बजेटमध्ये नेमके काय आहे, खरेतर मा.आयुक्त सो., यांनी सांगितले आहे की, सर्वसमावेशक असे बजेट मी सादर केले आहे. प्रत्येक नगरसेवकांची या संदर्भात काही ना काही तक्रार आहे, मग तो दिव्याचा नगरसेवक असो, घोडबंदरचा नगरसेवक असो अथवा वागळेचा नगरसेवक असो किंवा डोंगरावरचा नगरसेवक असो. मा.महापौर महोदय, जो कर दाता आहे त्या प्रत्येकाचा या बजेटमध्ये विचार होणे आवश्यक आहे, परंतू ते होत नाही. बजेट बाबत सर्वच नगरसेवकांची तीच ओरड आहे. असे म्हणतात ना की, जिसकी लाठी उसकी भैंस. आता सध्या एक प्रचलित असा एक सुविचार आहे, हम दो आपके चार, हम बनाये हमारा सुखी संसार बाकी सब बेकार अशातील म्हण सध्या प्रचलित आहे. त्यामुळे बजेटबाबत बोलण्याचा देखिल त्यांना उत्साह राहिलेला नाही. त्यामुळे मा.महापौर महोदय, या प्रशासनाने दिलेली माहिती आहे त्या अनुषंगाने सांगतो की दर वर्षी आपण बजेट तयार करतो, सन २००९ चा जर आपण ऑडिट रिपोर्ट पाहिला तर त्या वेळेचे बजेट हे ॲक्च्युअल फिगरच्या वेळेला ७०% नी कमी झाले होते. काही जण म्हणतात की सूज आली, पण किती अवस्था आपण तयार करतो आहोत, आज २०१०-११ ला ॲक्च्युअल फिगर जी होती ती ११०३ कोटींची, म्हणजे जी मूळ जमा झाली, खर्च किती झाला तो सोडून दया. त्यावेळेला २००० गृहीत धरुन त्याप्रमाणे आपण बजेट तयार केलेले असणार आणि त्याप्रमाणे खर्च केलेला असणार. आणि मग ते स्पील ओव्हर वाढते. त्याच बरोबर २०११-१२ ला १५०० कोटी आणि २०१२-१३ ला १३३३ कोटी ही ॲक्च्युअल फिगर आहे. ३१ मार्चला आपल्याकडे ॲक्च्युअली जमा झालेल्या या रकमा आहेत. आणि जर या तीन वर्षाचा आपण विचार केला तर सन २०१३-१४ चे बजेट पाहता, आपण २१०० चे बजेट आपण मागील वर्षी मंजूर केले. त्यानंतर सुधारीत मध्ये ते १६०० वर आणले. आणि हे १६०० चे देखिल मंजूर केले पण प्रत्यक्ष आकडेवारी पाहिली तर १३७६ कोटी इतकीच आहे. म्हणजे गेल्या तीन ते चार महिन्यात इन ॲव्हरेज असे आहे की १३०० ते १४०० कोटी फक्त आपल्याकडे जमतात. आणि त्या अनुषंगाने आपण खर्च किती करतो हयाचा देखिल विचार केला गेला पाहिजे. फक्त मी आहे माझ्या प्रभागात काहीतरी व्हावे किंवा माझा मतदार संघ मी सांभाळावा या दृष्टीने जर विचार केला तर योग्य होणार नाही. मा.महापौर महोदय, आस्थापना खर्च आणि स्पील ओव्हर पाहिले तर, भांडवली खर्चामध्ये ११६१ कोटींचे स्पील ओव्हर आहे. ७७२ कोटींचे देयक आहे. हे जर दिले आणि आस्थापना आणि इतर महसूली खर्च जर धरला तर मला वाटत नाही की, या आर्थिक वर्षामध्ये खर्च करायला आपल्याकडे काही शिल्लक आहे. तरी आपण हया ठिकाणी ज्या

काही सूचना करतो आहोत त्याकरिता आयुक्त सो., या ठिकाणी सभागृहात उपस्थित पाहिजेत अशी मा.महापौर महोदय, मी विनंती केली होती. ठिक आहे आपण प्रयत्न करीत असतो. पण तो नुसता प्रयत्न नव्हे तर त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. हा अर्थसंकल्प म्हणजे केवळ संकल्प नव्हे तर तो प्रत्यक्षात आणण्याकरिता सर्वांची मानसिकता असणे अत्यावश्यक आहे. आणि म्हणून प्रशासनाचे प्रमुख इथे असणे आवश्यक होते. कारण या ठिकाणी जो अर्थसंकल्प सादर करण्यांत आलेला आहे तो वास्तवात जर आणायचा असेल तर तो ते करु शकतात का ? मा.महापौर महोदय, एकूण जर पाहिले तर हया वर्षी केलेले हे बजेट योग्य नाही असे मला वाटते. कारण आस्थापनेचा खर्च हा जवळजवळ २४% होतो आहे. प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार आपण १४०० कोटींच्या वर जाऊ शकत नाही. मा.महापौर महोदय, आपण कुठेही करवाढ किंवा दरवाढ केलेली नाही आणि आपल्या अधिकाऱ्यांची जी मानसिकता आहे, आपण फक्त वाढवून सांगतो आहोत की, ७० नाही ९० कोटी करा, LBT ५०० नाही ६०० कोटी करा. पण वस्तुस्थिती मात्र काय आहे आणि काय होते हे पहाणे आवश्यक आहे. ताणून ताणून किती बजेट ताणायचे, किती फिगर वाढवायची ? आणि १४०० कोटींचे ॲव्हरेज आहे ती ॲक्च्युअल फिगर जमा होते आणि आपण दरवर्षी जवळजवळ २००० कोटी आता आपण २३०० कोटी केले तयार आहेत. खर्चाची तरतूद केली की आपण खर्च करतो आणि मग सगळा स्पील ओव्हर आपल्या अंगावर येते. आताचा स्पील ओव्हर आणि महसूली देणे आहे तो खर्च आणि अदा करावयाचे घेतलेले खर्च लक्षात घेतले तर आता आपण तयार केलेले या वर्षाचे बजेट हे शून्य आहे. हे माझे म्हणणे चुकीचे नाही. अकौंटचे नॉलेज ज्यांना आहे ते प्रत्येकजण ही बाब मान्य करतील. मग जर आपल्याला या गोष्टी पूर्ण करायच्या असतील तर आपली मानसिकता काय असली पाहिजे ? अंथरुण पाहून पाय पसरायचे अशी जी म्हण आहे ती या ठिकाणी लागू पडते. सन्मा.सदस्य श्री.हिरा पाटील त्यांच्या टिपीकल भाषेत चांगले बोलले आहेत, की आपल्याकडे पैसा किती आहे आणि त्याचा विनियोग कसा करायचा हे आपण पहात नाही आहोत. यामुळे मा.महापौर महोदय, जर असे झाले तर आपली महापालिका ही दिवाळखोरीत निघेल. तरी याचा गांभिर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे. आता आपल्याकडे १६०० कोटींचे सुधारीत बजेट आलेले आहे. म्हणजे आपण फसवितो किती आहोत, १६०० कोटी आपल्याकडे नाहीच आहेत. ॲक्च्युअल किती आहेत १३७६ कोटी म्हणजे आपण काय करतो आहोत ? तरी मा.महापौर महोदय, या सगळया गोष्टींचा विचार करावा. आम्ही या ठिकाणी बारंवार सूचना करीत असतो, मी तर जमेच्या बाजूने काय काय करता येईल हयाबाबत सूचना करीत असतो, परंतू त्या सूचनांची अंमलबजावणी होत नाही. म्हणजे अशा काही गोष्टी आहेत की, तिथे तर जमेच्या बाबतीत एवढा गोंधळ आहे परंतू त्यांचा विचार होत नाही. जकात बंद करायच्या आधी आपल्याकडे अनेक लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत की ज्यांच्याकडून करोडो रुपये जमा व्हायचे आहेत आणि आता तर दाखविले आहेत फक्त ४.७१ कोटीच दाखविले आहेत, परंतू नोटीस जारी केल्या आहेत त्यानुसार जर रक्कमा जमा केल्या असत्या तर करोडो रुपयांचा भरणा होऊ शकला असता.

रस्ता फोड फी बाबत सांगितले की, इथे मोठा भ्रष्टाचार आहे, इथे गोंधळ होत आहे. नगर अभियंता हयांना मी सांगितले होते की संबंधित ज्या एजन्सी आहेत त्यांना पत्र पाठवा. पण काही केले नाही . आणि ही जर मानसिकता असेल तर ही महानगरपालिका दिवाळखोरीत निघणार. ऑलरेडी निघाली आहे, परंतू आता अधिकृत जाहिर होईल. महापालिका हद्दीतील एखादया सुजाण नागरिकाने जर बजेट बघितले तर तो सांगेल की तुम्ही कामकाज करण्याच्या योग्य नाही आहात. कारण हया पध्दतीत ही आकडेवारी आहे तीच सांगते आहे की जमा किती केला आहे, खर्च किती आहे, तुमच्यावर कर्ज किती आहे ? मा.महापौर महोदय, खूप बोलायचे आहे, परंतू तुमची मानसिकता दिसत नाही आहे. मी फक्त एवढेच बोलतो की, आपण हयाचा गांभिर्याने विचार करावा आणि पावले उचलावीत.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

**तद्नंतर मा.महापौर सो., सभा खंडीत झाल्याचे घोषित करतात.**

**श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील**
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**(सौ.छाया प्रकाश मानकर)**
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : १९ जुलै २०१४
सभा खंडीत झाल्याची वेळ : दुपारी २.४५ वा.